# जपानी पुष्परचना - भाग १०

मे महिन्यात आपण इकेनोबो स्कूलच्या पारंपारिक मोरीबाना रचनांची माहिती आणि त्याबरोबर काही रचना पाहिल्या होत्या.

यावेळी 'शोका ' नावाच्या पारंपारिक रचना कश्या असतात ते पाहू या!

मोरीबाना रचनांमध्ये कुटुंबव्यवस्था फुलापानांच्या माध्यमातून कशी मांडली ते पाहिले. शोका रचनांमध्ये भूतकाळ, भविष्यकाळ व वर्तमानकाळ दाखवला जातो. 'शिन' ही मुख्य फांदी अथवा फूल हे वर्तमानकाळ दर्शविते. 'सोय' ही दुसरी फांदी अथवा फूल भूतकाळाचे प्रतिनिधित्व करते. तिसरी फांदी म्हणजे 'ताय' हे भविष्यकाळाचे प्रतीक मानले जाते. या सर्व फांद्या एकाच खोडातून आल्यात असे रचना पाहताना दिसते. जणू काही निसर्गातील झाड प्रातिनिधिक रूपाने पुष्पपात्रामध्ये उभे केले आहे असे वाटते. खोडा सारखा दिसणार जो रचनेतील पाण्याच्या वरचा भाग आहे (४-५ सेंटिमीटर) त्याला मिझुगिवा असे म्हणतात. तसेच फांद्यांची उंची किती घ्यावयाची यासंबंधी काही नियम आहेत. एका रचनेमध्ये किती प्रकारची फुले पाने वापरायची याबद्दल सुद्धा काही नियम आहेत.

**रचना १** मध्ये हेलिकोनियम व त्याचे पान, ऑर्किड आणि लिलीची लांब पाने वापरली आहेत.



**रचना २** मध्ये रंगीत अळूची पाने, साँग आफ इंडियाची फांदी आणि कोंबड्याचा तुरा फुले वापरली आहेत.




**रचना ३** मध्ये 'मेफ्लॉवर' चे एक मोठे फूल व त्याची पाने वापरली आहेत.



आत्तापर्यंत पाहिल्या त्यापेक्षा या रचनांची मांडणी थोडी वेगळी आहे.


**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

(M. Sc, M. Phil, Chemistry)

व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना पुणे शाखा

ई मेल asdssd@gmail.com